आ. क्र. ४२
३।७।९५

जा. क्र. माध्य. ३/प्रथम मान्यता/पुवि/५९२६
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे :- १ यांचे कार्यालय.
दि. :- 31 JUL 19

प्रति,

मा. शिक्षणाधिकारी [माध्यमिक],
जिल्हा परिषद, ------------- पुणे. -------------

विषय :- प्रथम मान्यता.
काळभैरवनाथ विद्यालय, खडकी [पिंपळगांव] ता. आंबेगांव.

संदर्भ :- आपले पत्र क्र. शिक्षण/माध्य/ई-४/९४-९५, दि. २२.७.९५

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२, ३.३, अन्वये ------------------------------ राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्थेच्या ------------------------------ काळभैरवनाथ विद्यालय, खडकी, [पिंपळगांव] ता. आंबेगांव माध्यमिक शाळेच्या इयत्ता ८वी /९वी /१०वी च्या वर्गास सन १९९४- १९९५ या शैक्षणिक वर्षासाठी जून १९९ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठविताना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१] संस्थेने स्वत:च्या मालकीची शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयावर प्रयोगशाळा सर्व साहित्यानीशी उपलब्ध करुन द्यावी.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथाची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावे.
६] पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन द्यावा.
७] स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन द्यावी.
८] वाढीव फी चे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९] शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१० ] कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११ ] शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२ ] विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३ ] अनधिकृत वर्ग बंद करावेत.
१४ ] ~~८वी, ९वी, १०वी अनधिकृत वर्ग चालू आहेत.~~
१५ ] ~~मान्यता तात्पुरत्या आहे.~~

[illegible] शि. उ. सं. यांची
सही असे

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत :- मुख्याध्यापक, ------------------------------
काळभैरव विद्यालय, खडकी,
पिंपळगांव ता. आंबेगांव, जि. पुणे.